# दॅट्स ऑल युवर ऑनर

अभय शरद बापट



# दॅट्स ऑल युवर ऑनर

## अभय शरद बापट

*Publication: NotNul*

*Published On: October, 2024*

© *अभय शरद बापट*

## प्रकरण - 1

आकृती सेनगुप्ता ने आपली गाडी लुल्ला रोलिंग या कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवलेल्या जागेत लावली तेव्हा पावसाला नुकतीच सुरुवात झाली होती. थंड बोचरी हवा पडली होती. तिने गाडीच्या काचा लावल्या आणि आपला रेन कोट कसाबसा गुंडाळला आणि झपाझप चालत 'फक्त कंपनीच्या सेवकांसाठी' असं लिहिलेल्या दारातून आत आली. दुपार पर्यंत पाऊस पडतच होता पण आकृती ला ती इमारत सोडायची गरज नव्हती कारण कॅफेटेरीया असंलेल्या मुख्य इमारतीत जाण्यासाठी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना तळ घरातील बोगद्याचा रस्ता होता.

ऑफिस संपायच्या वेळेला तिच काम अर्धवट राहणार अशी चिन्ह तिला दिसायला लागली होती. काहीही झालं त्तरी आज रात्रीच्या मेल ने काही माहिती पाठवायलाच लागणार होती. अजून अर्धा तास तरी थांबायला लागणारच होत. अर्थात आकृती ही घड्याळाकडे बघून काम करणारी नव्हतीच कधी.पुढचा काही वेळ आसपासच्या लोकांच्या गोंगाटाकडे लक्ष न देता तिने कामाला सुरवात केली. जेव्हा तिच काम संपल तेव्हा तिच्या अधिकाऱ्याकडे, जयराज आर्य कडे ते घेऊन गेली. त्याला आनंद झाला आणि आश्चर्य वाटले. त्याने घड्याळाकडे नजर टाकली. "खरोखर खूप आभार तो म्हणाला."

"अहो आभार वगैरे नका मानू. मला माहिती होत की ते आज रात्रीच मेल ने जायला हवंय."

"अग, पण सगळ्याच जणी असा विचार नाही करत." तो म्हणाला. "तू ओव्हर टाईम चा विचार न करता काम केलेस !"

"चांगली नोकरी ही प्रामाणिक पणा दाखवण्याच्याच लायकीची असंते" ती म्हणाली आणि त्याला गुड नाईट करून बाहेर पडली. अजूनही पाऊस पडतच होता. झपाझप चालत ती तिच्या गाडीत बसली आणि किल्ली लाऊन गाडी सुरु करण्यासाठी प्रयत्न केला. इंजीन सुरु होण्याच कोणतच लक्षण दिसेना. गाडी बहुदा पावसात भिजल्याने गारठली असावी. एक –दीड मिनिट प्रयत्न करूनही जेव्हा गाडी सुरु झाली नाही तेव्हा तिला काळजी वाटायला लागली.तिने इकडे तिकडे बघितले, पार्कींग मधल्या जवळ जवळ सगळ्या गाड्या गेल्या होत्या अगदी मोजक्याच शिल्लक होत्या.

आता काय करायचं या विवंचनेत तिने सीट वर मान मागे टेकवून थोड थांबायचं ठरवलं., तिला बंद काचेवर कोणीतरी टकटक करत असंल्याचा भास झाला. खरं की तेवढ्यात स्वप्न बिप्न पडल की काय !

पण नाही, खरच कोणीतरी आस्थेने चौकशी करत होतं. "काय झालंय? काही अडचण आहे?" बाहेरून एक तरतरीत माणूस उत्साहाने विचारात होता., तिने

डावीकडील काच पूर्ण खाली घेतली. “गाडी सुरूच होत नाहीये खूप वेळ प्रयत्न करत्ये.”

“तुम्ही जेवढा स्टार्टर माराल तेवढी बॅटरी संपत जाईल. थोडावेळ अजिबात स्टार्टर मारू नका. बघू दे मला जरा काय झालंय ते”

त्याने गाडीच्या पुढे जाऊन बॉनेट उघडले. आपले डोके आत घातले. जरा वेळाने डोके बाहेर काढून म्हणाला, “माझ्या उजव्या हाताकडे लक्ष द्या. मी हात हलवला की स्टार्टर मारा. हात खाली आणला की सोडून द्या.समजलं?”

“हो करते बरोबर.” ती कृतज्ञतेने म्हणाली. कोणीतरी आहे म्हटल्यावर तिच्या जीवात जीव आला होता.

दुर्दैवाने, त्याने सांगितलेले करून सुद्धा गाडी सुरु झाली नाही.हताश पणे त्याने आपले डोके आणि खांदे बॉनेट च्या बाहेर काढलं. हात झटकत तो तिच्याकडे बघत म्हणाला. “स्पार्क पडत नाहीये अजिबात.मला नाही वाटत मी काही करू शकीन.” पराभूत नजरेने तो म्हणाला. “सर्वात सोपं म्हणजे तुम्ही गाडी इथेच सोडून जा.उद्या पाऊस थांबेल, ऊन पडलं की गाडी तापेल आणि आपोआपच सुरु होईल.”

“पण मला… म्हणजे… मी…” ती अडखळली

त्याने तिची अडचण ओळखली. “माझी गाडी इथेच आहे. मी तुम्हाला जवळच्या बस स्टॉप पर्यंत सोडू शकतो किंवा टॅक्सी मिळेल अशा ठिकाणी सोडू शकतो.”

आकृती ने त्याच्याकडे नीट पहिले. चेहेरा हसरा होता.दात एकसारखे आणि आकर्षक होते.शिवाय त्याची गाडी इथेच आहे म्हणाला तो म्हणजे तो कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी असायची शक्यता होती. आणि तिला बस स्टॉप पर्यंत जायला दुसरा पर्यायच नव्हता.पावसातून पायपीट करत जायचे तरी चांगले चार किलोमीटर चे अंतर होते.

“तुम्हाला नक्की काही त्रास पडणार नाही ना?” तिने अवघडल्या सारखे होत विचारलं

“नाही हो, अजिबात नाही.” दार उघडत तो म्हणाला. ‘काचा मात्र घट्ट लाऊन घ्या. आज रात्री पर्यंत पाऊस थांबेल असा वेध शाळेचा अंदाज आहे.’

तो तिला घेऊन त्याच्या गाडीपाशी गेला तेव्हा तो कोण आहे तिला कळले.

कंपनीचा मालक नमन लुल्ला चा तो मुलगा होता.तपन लुल्ला !

तपन ने अदबीने त्याच्या गाडीचे दार तिच्यासाठी उघडून धरले. ती आत बसली गाडीतल्या गुबगुबीत सीट वर ती अवघडत बसली.फार म्हणजे फारच अद्ययावत गाडी होती ती. कौतुकाने इकडे तिकडे नजर बघे पर्यंत तो उडी मारून गाडीत बसला

सुद्धा.त्याच क्षणी गाडी चालू झाली,म्हणजे इंजिनाचा आवाज आलाच नाही तिला फक्त वेगात पुढे गेल्यामुळे जो झटका बसला अचानक त्यामुळे खर तर गाडी चालू झाल्याचे कळले. पार्किंग मधल्या गार्ड ने त्याला सलाम केला आणि ते बाहेर पडले.

“डावी कडे की उजवी कडे ?” तपन लुल्लाने विचारलं.

“डावी कडे.” ती म्हणाली.

“मस्त, मलाही डाव्या बाजूलाच वळायचं होत.” तो म्हणाला. “किती पुढे जायचंय?”

“माझ्या गाडीच्या स्पीडो मीटर च्या हिशोबाने दोन किलोमीटर आहे पण तुमच्या गाडी एवढी ती आधुनिक नसल्याने अगदी बरोब्बर तेवढेच होईल असे नाही.” ती लाजत म्हणाली.

“काय पत्ता आहे ?”

तिने सांगितला.

“हे बघ... बये.... काय नाव तुझे ? ते विचारायचे राहिलेच”

“आकृती सेनगुप्ता” ती उत्तरली.

“माझं तपन लुल्ला.” तो म्हणाला. ‘‘मला अचानक आठवलं की मला आमच्या वडिलांना तातडीने देण्यासाठी काही कागदपत्रे बरोबर घ्यायची होती. पण वाटेत तू

दिसलीस, गाडीची बॅटरी तू संपवत चालली होतीस, तुला मदत करायला गेलो आणि त्या नादात तेच विसरलो.”

“काही हरकत नाही, तुम्ही मला बस स्टॉप पर्यंत सोडा.”

“त्यापेक्षा माझ्याकडे वेगळी कल्पना आहे.” त्याने सुचवले. “मला जिथे कागदपत्र पोचवायची आहेत ते ठिकाण वाटेतच आहे.अर्थात तुला घाई नसेल तर मी पटकन मध्ये उतरून ती कागदपत्रे संबंधीताकडे देऊन येतो. तू गाडीतच बस हव तर, गाडीत रेडिओ आहे, गाणी ऐक, बातम्या ऐक कसंही. त्या नंतर मी तुला घराजवळ सोडून पुढे जाईन. आणि नंतर मी मोकळाच आहे त्यामुळे तू म्हणालीस तर वाटेत काहीतरी खाऊ सुद्धा आपण.”

ती एकदम संकोचली. कंपनीच्या मालकाबरोबर गाडीतून प्रवास! मग खाणे! “नाही... म्हणजे... मी... तशी घाई नाही मला पण... तुम्हाला जर काही त्रास होणार नसेल तर…”

“अजिबात त्रास नाही. तसे मला नंतर पुन्हा शहरात यावेच लागणार आहे कागदपत्रे दिल्या नंतर.”

“पुन्हा शहरात !” ती उद्गारली. “केवढे लांब आहे ते.”

“या गाडीने नाही वाटत लांब.” तो म्हणाला. “आपण गर्दी टाळून लांबचा पण रिकामा रस्ता पकडू. आणि तू नाही म्हणाली नाहीस तेव्हा तुझा जेवणाला होकार आहे असे मी समजतो.”

“त्या विषयी आपण नंतर चर्चा करू. म्हणजे तुमची व्यवस्थित ओळख झाल्या नंतर ठरवीन मी.”  ती बोलून गेली फटकळ पणे, पण तिलाच वाईट वाटलं

“अगदी , काही हरकत नाही.” त्याला हसू आले तिच्या उत्तराचे.

हमरस्त्यावरून तपन पंधरा मिनिटे गाडी चालवत राहिला. नंतर एका कच्च्या रस्त्याला गाडी वळली. चार पाच किलोमीटर नंतर एका धुळीच्या रस्त्यावून टेकडीच्या चढाच्या बाजूला गाडी लागली, आता ते पूर्ण पणे वाहतुकीच्या पासून दूर आले होते.

“किती आहे अजून पुढे ?” तिच्या स्वरात संशय होता.

“आलंच आता लगेच.आमच्या कंपनीचे इथे आउट हाऊस आहे तिथे. तिथे कंपनीचा एक माणूस थांबलाय माझी वाट बघत, मी त्याला दिलंली कागदपत्रे तो माझ्या वडलाना देणार आहे.” तपन ने खुलासा केला.

“ओह हो.” ती उद्गारली. कंपनीचे असे काही आउट हाऊस आहे हे तिला माहिती होते त्यामुळे मगाशी मनात आलेली शंका दूर झाली आणि ती जरा निश्चिंत होवून मागे रेलून बसली. कच्चा रस्ता वळणा वळणाचा होता. दोन्ही बाजूने काटेरी

कुंपण होते.थोड्याच वेळात त्यांची गाडी एका कुलूप लावलंल्या गेट समोर उभी राहिली. त्याने गेट उघडले आणि आत त्याला जोडून असंलेल्या स्विमिंग पुला वरून त्याने गाडी पुढे घेतली. एक मस्त पैकी टुमदार घर समोर ते आले होते. त्याच्या चारी बाजूने मंडपाकार कमानी होत्या. त्यात अत्त्युच्च दर्जाचे फर्निचर ठेवले होते.

“तो माणूस इथे दिसत नाहीये.” तपन पुटपुटला.

“हो ना. तेच माझ्या मनात आलं.गेट लावलंलं आहे आणि आतही अंधार आहे.”

“गेट कायम लावलंलेच असंते .त्याच्या कडे किल्ली असंते.त्याचे काही विशेष नाही, आत अंधार आहे हे मात्र विचित्र आणि न पटणारे आहे.” -तपन म्हणाला. “मिस सेनगुप्ता मी तुम्हाला उगाचच या घोळात गुंतवल असे मला वाटायला लागलंय. पण तो माणूस इथे असायलाच हवा होता  म्हणजे आज रात्री तो इथेच राहणार होता आणि उशिरा पर्यंत वडील इथे मिटींग साठी येणार होते.”

“तो झोपला असेल आत आणि दिवे बंद केले असंतील.” ती म्हणाली.

“तुम्ही बस इथेच , मी आत जाऊन अंदाज घेऊन येतो नेमके काय झालंय.”

तो आत गेला. आतले दिवे लागलेले तिला गाडीतून दिसले. तब्बल पाच मिनिटांनी तो घरातून बाहेर आला तेव्हा त्याच्या चेहेऱ्यावर अपराधी भाव होते.

“एक लफडं होवून बसलय.” तो तिला म्हणाला.